# THE BOMBAY COTTON CONTRACTS ACT, 1932.

( Bom. IV of 1932 ).

# मुंबई कापूस करार अधिनियम, १९३२.

## अनुक्रमणिका.

प्रस्तावना.

| कलमें. | | पान. |
|---|---|---|
| १. | लघुसंज्ञा ... ... ... ... | ४०१ |
| २. | व्याप्ति व अंमल ... ... ... ... | ४०१ |
| ३. | व्याख्या ... ... ... ... | ४०१ |
| ४. | मान्यता ... ... ... ... | ४०२ |
| ५. | मान्यता दिलेल्या संघाचे संचालक मंडळ असणें : उपविधी करण्याचा अधिकार ... | ४०३ |
| ६. | संचालक मंडळाचा उपविधि करण्याचा अधिकार ... ... ... | ४०४ |
| ७. | उपविधि प्रसिद्ध करणें ... ... ... ... | ४०५ |
| ८. | निरर्थक करार ... ... ... ... | ४०५ |
| ९. | (रद्द केलें) | |
| १०. | (रद्द केलें) | |
| ११. | अधिकारी वगैरे यांच्या विरुद्ध दावे दाखल करण्यास व काम चालविण्यास मनाई. ... ... ... ... | ४०५ |
| १२. | बचाव ... ... ... ... | ४०५ |

# सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४.

## [मुंबई कापूस करार अधिनियम, १९३२.]

[ २८ ऑक्टोबर १९३२. ]

ह्या अधिनियम सन १९३८ चा मुंबई अधिनियम १७ याअन्वयें अंशत: रद्द करण्यांत आला आहे व त्यांत पुढील आदेशांअन्वयें व अनुकूलन रूपभेद करण्यांत आले आहेत:—

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

## मुंबईतील कापसाच्या व्यवहारांचें अधिक चांगल्या रीतीनें नियमन करणें व त्यांवर नियंत्रण ठेवणें यासाठीं तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, कापसाच्या व्यवहारांचें अधिक चांगल्या रीतीनें नियमन करणें व त्यांवर नियंत्रण ठेवणें इष्ट आहे; आणि ज्याअर्थी, प्रस्तुत अधिनियम संमत करून घेण्यासाठीं, भारत शासन अधिनियम, कलम ८०-अ, पोट-कलम (३) अन्वयें आवश्यक असलेली गव्हर्नर-जनरल यांची पूर्व मंजुरी मिळविण्यांत आली आहे; त्याअर्थी, याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे:—

१. ह्या अधिनियमास मुंबई कापूस करार अधिनियम, १९३२ असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. (१) हा अधिनियम मुंबई शहर व साष्टी बेट यांस लागू होईल. व्याप्ति व अंमल.

(२) तो, राज्य सरकार राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें; जी तारीख निर्दिष्ट करील त्या तारखेस अंमलांत येईल.

३. विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास, ह्या अधिनियमांत,— व्याख्या.

(अ) "मुंबई" म्हणजे मुंबई शहर व साष्टी बेट;

[कंडिका (ब) ही सन १९३८ चा मुंबई अधिनियम १७, कलम २ व पहिली अनसूचि यांअन्वयें गाळण्यांत आली.]

(क) "संचालक मंडळ" या संज्ञेचा अर्थ, जें कलम ५ अन्वयें रचना करण्यांत आलेलें असेल व जें योग्य रीतीनें बोलाविलेल्या व भरलेल्या आपल्या सभेंत गणपूर्ति होण्यास कमींत कमी आवश्यक इतक्या सदस्यांमार्फत काम चालवीत असेल असें मान्यता दिलेल्या कापूस संघाचें संचालक मंडळ असा समजावा;

(ड) "प्रमाणित गुदाम" या संज्ञेचा अर्थ, कापूस सांठवून ठेवण्यासाठीं कापूस संघानें चालविलेलें व संघाच्या उपविधींअन्वयें प्रमाणपत्र दिलेलें गुदाम असा समजावा;

(ई) "करार" या संज्ञेचा अर्थ, कापसाची विक्री किंवा खरेदी यासंबंधीं मुंबईंत केलेला किंवा पूर्णत: अगर अंशत: पुरा करावयाचा करार असा समजावा आणि तींत कापसाच्या भावी खरेदीविक्रीच्या हक्कांसंबंधींच्या कराराचा समावेश होतो, परंतु तींत राज्य सरकार राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें जे करार ह्या अधिनियमाच्या उपबंधांच्या कक्षेंतून वगळण्यांत यावेत असें जाहीर करील त्या करारांचा समावेश होत नाहीं;

(फ) "कापूस संघ" म्हणजे कापसाची विक्री, खरेदी किंवा इतर व्यवहार यांसंबंधींच्या धंद्याचें नियमन करण्यासाठीं किंवा त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठीं स्थापन केलेला किंवा बनविलेला कोणताहि संघ, संघटना किंवा व्यक्तींची मिळून झालेली मंडळी—मग ती संस्थापित असो किंवा नसो ;

(ग) "वायदे करार" म्हणजे कापूस कोणत्यातरी पुढील तारखेस स्वाधीन करण्याविषयीं केलेला करार ;

(ह) "कापसाच्या भावी खरेदीविक्रीच्या हक्कासंबंधींचा करार" या संज्ञेचा अर्थ, भावी काळांत कापूस खरेदी करण्याचा हक्क अथवा त्याची विक्री करण्याचा हक्क अथवा त्याची खरेदी किंवा विक्री करण्याचा हक्क याची खरेदी किंवा विक्री करण्याकरितां मुंबईत केलेला किंवा पूर्णतः किंवा अंशतः पुरा करावयाचा करार, असा समजावा आणि तींत कापसांतील तेजीचा, मंदीचा किंवा तेजी-मंदीचा समावेश होतो ;

(आय्) "हजर करार" या संज्ञेचा अर्थ, ज्या करारांत कापूस ताबडतोब स्वाधीन करण्याचें ठरविलेलें असते तो करार असा समजावा ;

(ज) "मान्यता दिलेला कापूस संघ" या संज्ञेचा अर्थ, कलम ४ मध्यें तरतूद केल्याप्रमाणें राज्य सरकारनें त्या त्या वेळीं मान्यता दिलेला कापूस संघ असा समजावा.

मान्यता. ४. (१) ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांकरितां, मान्यता मिळण्याची इच्छा असलेल्या कापूस संघानें, अशी मान्यता मिळण्यासाठीं राज्य सरकारकडे लेखी अर्ज केला पाहिजे व कापसाच्या व्यवहारांचें नियमन करण्याबाबत व त्यांवर नियंत्रण ठेवण्याबाबत आपण केलेले उपविधि सादर केले पाहिजेत आणि अशा मान्यतेच्या बाबतींत जी माहिती पुरविण्याविषयीं राज्य सरकार वेळोवेळीं फर्मावील ती पुरविली पाहिजे.

(२) अशी मान्यता देण्याचा किंवा नाकारण्याचा राज्य सरकारास अधिकार आहे.

(३) (अ) कापूस संघानें पोट-कलम (१) अन्वयें सादर केलेल्या उपविधींत, मान्यता मिळण्यासाठीं अर्ज करणाऱ्या कापूस संघाच्या संचालक मंडळाच्या एकूण संख्येपैकीं एक-चतुर्थांशापेक्षां कमी नाहींत इतके संचालक कापसाची लागवड करणारे इसम असले पाहिजेत व त्यांची नेमणूक उक्त उपविधींत विहित केलेल्या रीतीनें व राज्य सरकारच्या पसंतीनें करण्यांत आली पाहिजे अशी तरतूद केलेली नसल्यास, आणि

(ब) मान्यता मिळण्यासाठीं अर्ज करणाऱ्या कापूस संघाच्या बाजारांचा तसेंच उक्त संघाच्या बाजाराच्या जागांचा सर्वस्वी कबजा व त्यांची खरीखुरी व्यवस्था, नियंत्रण व नियमन ह्या गोष्टी उक्त कापूस संघाकडे आहेत अशी राज्य सरकारची खात्री न झाल्यास,

राज्य सरकार अशा संघास मान्यता देण्याचें नाकारील.

(४) तसेंच पोट-कलम (१) अन्वयें कापूस संघानें सादर केलेले उपविधि अशी मान्यता देण्याच्या तारखेपूर्वी निदान एक महिना अगोदर राजपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आले नाहींत तर राज्य सरकार संघास मान्यता देण्याचें नाकारील :

परंतु, पोट-कलम (१) अन्वयें मान्यता मिळण्यासाठीं अर्ज करणाऱ्या कापूस संघाच्या बाबतींत मान्यता मिळण्यापूर्वी आवश्यक असलेल्या व पोट-कलम (३), उप-कंडिका (अ) व (ब) यांत निर्दिष्ट केलेल्या शर्ती पुऱ्या करण्यांत आलेल्या आहेत आणि उक्त कापूस संघाचे उपविधि हे, ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशन, लिमिटेडची जी नियमावलि व जे उपविधि पोट-कलम (७) च्या उपबंधांअन्वयें मान्यता दिलेल्या कापूस संघाचे उपविधि म्हणून समजण्यांत येतात किंवा समजण्यांत आले आहेत अशा नियमावलीशीं व उपविधींशीं सर्व महत्त्वाच्या बाबतींत समान आहेत असें राज्य सरकारचें मत असेल तेव्हां, राज्य सरकारास, मान्यता मिळण्यासाठीं अर्ज करणाऱ्या कापूस संघाचे उपविधि

ह्या पोट-कलमाअन्वयें प्रसिद्ध करण्याची आवश्यकता नाहीं असें ठरविण्याचा व अशा संघास मान्यता देण्याचा अधिकार आहे. त्यानंतर अशा संघाचे उपविधि हे ह्या पोट-कलमाच्या उपबंधाअन्वयें प्रसिद्ध केलेले उपविधि आहेत असें समजलें पाहिजे.

(५) कापूस संघाचे उपविधि प्रसिद्ध करण्याची आवश्यकता नाहीं असें ठरवून राज्य सरकारनें पोट-कलम (४) च्या परंतुकाच्या उपबंधांअन्वयें अशा संघास मान्यता दिली असेल तेव्हां, असे उपविधि अशा संघास मान्यता दिल्याच्या लगतनंतर राजपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत.

(६) मान्यता कां काढून घेण्यांत येऊं नये याचा खुलासा करण्याची वाजवी संधि कापूस संघास दिल्यानंतर, राज्य सरकारास कापूस संघास दिलेली मान्यता कोणत्याहि वेळीं काढून घेण्याचा अधिकार आहे आणि त्यानंतर असा कापूस संघ मान्यता दिलेला कापूस संघ असण्याचें बंद होईल.

(७) ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशन लिमिटेड, हा, ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांकरितां व त्याच्या उपबंधांस अधीन राहून मान्यता दिलेला कापूस संघ आहे असें याअन्वयें जाहीर करण्यांत येत आहे आणि उक्त संघाची नियमावलि व उपविधि हे, कलमें ५ व ६ यांच्या उपबंधांअन्वयें ज्या बाबींसाठीं उपविधि करतां येतात त्या बाबींशीं त्यांचा संबंध असेल तेथवर एखाद्या मान्यता दिलेल्या कापूस संघाचे उपविधि आहेत असें समजलें पाहिजे :

परंतु, हा अधिनियम अंमलांत आल्यानंतरची जी कोणतीहि मुदत राज्य सरकार लेखी आदेशाद्वारें निर्दिष्ट करील त्या मुदतींत उक्त संघानें, पोट-कलम (३), कंडिका (अ) व (ब) यांत निर्दिष्ट केलेल्या ज्या शर्ती मान्यता मिळण्यापूर्वी पुऱ्या करावयाच्या असतील त्या पुऱ्या केल्या नसतील तर उक्त संघ हा, मान्यता दिलेला कापूस संघ असण्याचें बंद होईल आणि उक्त संघाची नियमावलि व उपविधि हे मान्यता दिलेल्या कापूस संघाचे उपविधि म्हणून असण्याचें बंद होईल.

स्पष्टीकरण.—"कापसाची लागवड करणारा इसम" या संज्ञेंत वायदे करारांचा व्यवहार करणाऱ्या इसमाचा समावेश होत नाहीं.

मान्यता दिलेल्या संघाचें संचालक मंडळ असणें : उपविधी करण्याचा अधिकार.

५. (१) मान्यता दिलेल्या प्रत्येक कापूस संघाचें एक संचालक मंडळ असेल. मान्यता दिलेल्या कापूस संघास, राज्य सरकारच्या मंजुरीस अधीन राहून, पुढील गोष्टींसाठीं उपविधि करण्याचा अधिकार आहे व अशा उपविधींत वेळोवेळीं जादा उपविधि दाखल करण्याचा, त्यांत फेरफार करण्याचा किंवा ते रद्द करण्याचाहि त्यास अधिकार आहे. त्या गोष्टी अशा :—

(अ) संचालक मंडळाची रचना,

(ब) संचालक मंडळाचे अधिकार व त्याचीं कर्तव्यें आणि त्यानें ज्या रीतीनें आपलें कामकाज चालविलें पाहिजे ती रीत,

(क) मतदारतालिकांची संख्या व रचना आणि अशा तालिकांत कोणते प्रतिनिधि असावेत तें,

(ड) संचालक मंडळाच्या सदस्यांची नेमणूक करण्याची रीत.

(२) पोट-कलम (१) अन्वयें केलेले, जादा दाखल केलेले, फेरफार केलेले किंवा रद्द केलेले उपविधि हे, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढें ते केल्याच्या लगतनंतर त्याचें जें अधिवेशन भरेल त्या अधिवेशनाच्या वेळीं ठेवण्यांत आले पाहिजेत आणि ते दोन्ही सभागृहांस संमत असलेल्या ठरावाअन्वयें फेरफार केले जाण्यास किंवा रद्द केले जाण्यास पात्र असतील. कोणत्याहि उपविधींत अशा रीतीनें फेरफार करण्यांत आल्यास किंवा तो रद्द करण्यांत आल्यास, अशा रीतीनें फेरफार केलेल्या उपविधीस मंजुरी देण्याचा व त्याप्रमाणें तो पुन्हा प्रसिद्ध करण्याचा किंवा तो अशा रीतीनें रद्द करण्यास मंजुरी देण्याचा राज्य सरकारला अधिकार आहे.

संचालक मंडळाचा उपविधि करण्याचा अधिकार.

६. (१) संचालक मंडळास, राज्य सरकारच्या मंजुरीस अधीन राहून, कापसाच्या व्यवहारांचें नियमन करण्यासाठीं व त्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठीं वेळोवेळीं उपविधि करण्याचा अधिकार आहे. तसेंच, त्यास अशा उपविधींत वेळोवेळीं जादा उपविधि दाखल करण्याचा किंवा त्यांत फेरफार करण्याचा किंवा ते रद्द करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषेंकरून व वरील उपबंधाच्या सामान्यतेस बाध येऊं न देतां, अशा उपविधींत पुढील गोष्टींसाठीं तरतूद करतां येईल :—

(अ) मान्यता दिलेल्या कापूस संघाच्या निरनिराळ्या वर्गांचे सदस्य दाखल करून घेणें व त्यांस वगळणें, तात्पुरतें दूर करणें, काढून टाकणें किंवा पुन्हा दाखल करून घेणें;

(ब) कापूस बाजार उघडणें व बंद करणें आणि ज्या वेळांत असे बाजार उघडले किंवा बंद केले पाहिजेत त्या वेळा व व्यापाराच्या वेळांचें नियमन करणें;

(क) करारांची व त्यासंबंधींच्या तफावतींची मुदतीमुदतीनें तडजोड करण्यासाठीं आणि माल स्वाधीन करण्यासंबंधींचे आदेश पाठविण्यासाठीं व कापसाच्या भावी खरेदीविक्रीच्या हक्कासंबंधींच्या करारांशीं संबध असलेल्या कोणत्याहि कारणासाठीं निष्कासगृह स्थापन करणें व अशा निष्कासगृहाचें नियमन करणें व तें चालविणें;

(ड) ज्या करारांची तडजोड निष्कासगृहामार्फत केली पाहिजे किंवा ज्या करारासंबंधींच्या तफावतीची रक्कम निष्कासगृहामार्फत दिली पाहिजे त्या करारांची संख्या व वर्ग;

(ई) तडजोड करण्याचे दिवस ठरविणें, बदलणें किंवा पुढें ढकलणें ;

(फ) सर्व प्रकारच्या कापसाचे बाजारभाव ठरविणें व जाहीर करणें ;

(ग) करारांच्या अटी, शर्ती व त्यांस आनुषंगिक असलेल्या गोष्टी व असे जे करार लेखी असतील त्यांचे नमुने ;

(ह) करार करणें, पुरे करणें व रद्द करणें या गोष्टींचें नियमन करणें; अशा करारांत, अडत्या व त्याचा नियोजक यांमधील अथवा दलाल व त्याचा नियोजक यांमधील अथवा जथावाला किंवा मुकादम व त्याचा नियोजक यांमधील अथवा मान्यता दिलेल्या कापूस संघाचा सदस्य व सदस्य नसलेला इसम यांमधील करारांचा समावेश होतो; तसेंच त्यांत विक्रेता किंवा खरेदी करणारा किंवा मध्यस्थ यांच्या नादारीमुळें होणारे परिणाम, विक्रेता व खरेदी करणारा यांनीं केलेल्या भंगाचे किंवा वर्जनाचे परिणाम आणि अशा करारांत सामील नसलेले अडते, मुकादम व दलाल यांची जबाबदारी या गोष्टींचा समावेश होतो ;

(आय्) मान्यता दिलेल्या कापूस संघाच्या सदस्यास, विशिष्ट वर्गाच्या किंवा प्रकारच्या कापसाचे व्यवहार करण्यास मनाई करणें ;

(ज) दावे व विवाद यांची लवादीनें तोडजोड करणें व निवाड्यांविरुद्ध अपिलें ;

(के) वर्गणी, फी, दंड व शास्ति बसविणें व वसूल करणें ;

(ल) मान्यता दिलेल्या कापूस संघाच्या सदस्यांविरुद्ध शिस्तविषयक उपाययोजना करणें; यांत संचालक मंडळानें केलेल्या कोणत्याहि उपविधीचा भंग केल्याबद्दल पदावरून तात्पुरतें दूर करणें, काढून टाकणें, दंड करणें व पैशाच्या स्वरूपांत नसलेल्या इतर शास्ती करणें यांचा समावेश होतो ;

(म) कोणत्याहि नात्यानें करार करणाऱ्या पक्षकारांमधील व्यवहारांचें नियमन करणें ;

(न) प्रमाणित गुदामें स्थापन करणें, चालविणें व त्यांवर नियंत्रण ठेवणें ; आणि

(ओ) कापसाच्या भावी खरेदीविक्रीच्या हक्कासंबंधीं करार करणें, पार पाडणें व रद्द करणें या गोष्टींचें नियमन करणें.

(३) मान्यता दिलेल्या कापूस संघाच्या उपविधींचा भंग एखाद्या कंपनीनें केला असेल तेव्हां, अशा कंपनीचा प्रत्येक संचालक व अधिकारी, असा भंग आपल्या नकळत व आपलें नियंत्रण नसतां घडला असें सिद्ध न करील तर तोदेखील असा भंग केल्याबद्दल जबाबदार आहे असें समजलें पाहिजे.

७. कलम ५ किंवा ६ अन्वयें केलेले उपविधि, ते कायम करण्यापूर्वी आगाऊ प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत व ते राज्य सरकारनें मंजूर केल्यानंतर राजपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत. उपविधि प्रसिद्ध करणें.

८. (१) ह्या अधिनियमांत यापुढें जी तरतूद केली असेल ती खेरीज करून जो कोणताहि करार (मग अशा करारांतील कोणताहि पक्षकार मान्यता दिलेल्या कापूस संघाचा सदस्य असो वा नसो) हा अधिनियम अंमलांत आल्याच्या तारखेनंतर करण्यांत आला असेल व जो कोणत्याहि मान्यता दिलेल्या कापूस संघाच्या उपविधींनुसार नसेल तो करार निरर्थक होईल. निरर्थक करार.

(२) अशा कोणत्याहि कराराच्या बाबतींत कोणतीहि अडत, दलाली, फी किंवा बक्षीस वसूल करण्यासाठीं कोणत्याहि न्यायालयांत कोणताहि दावा दाखल करण्यास परवानगी देतां कामा नये.

९. [संचालक मंडळ रद्द करणें व नियंत्रण मंडळाची नेमणूक, त्याचे अधिकार व कर्तव्यें.] सन १९३८चा मुंबई अधिनियम १७, कलम २ व पहिली अनसूचि यांअन्वयें रद्द करण्यांत आलें.

१०. [नियंत्रण मंडळाची नेमणूक कल्यानंतर विवक्षित करारांस मनाई.] सन १९३८ चा मुंबई अधिनियम १७, कलम २ व पहिली अनसूचि यांअन्वयें रद्द करण्यांत आलें.

११. हा अधिनियम किंवा तदन्वयें केलेले उपविधि यांनुसार किंवा ते अंमलांत आणतांना सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा जें करण्याचा इरादा आहे अशा कोणत्याहि कृत्याबद्दल मान्यता दिलेल्या कापूस संघाचा कोणताहि अधिकारी किंवा सेवक याच्याविरुद्ध कोणत्याहि न्यायालयांत कोणताहि दावा, खटला किंवा इतर वैध कारवाई दाखल करून घेतां कामा नये. अधिकारी वगैरे यांच्या विरुद्ध दावे दाखल करण्यास व काम चालविण्यास मनाई.

१२. (१) मुंबई कापूस करार अधिनियम, १९२२ याच्या उपबंधांअन्वयें केलेले करार हे, हा अधिनियम किंवा तदन्वयें केलेले उपविधि यांच्या कोणत्याहि उपबंधांशीं ज्या बाबतींत ते विसंगत असतील त्याव्यतिरिक्त इतर बाबतींत विधिसंमत आहेत असें समजलें पाहिजे. बचाव.

(२) हा अधिनियम अंमलांत येण्याच्या तारखेपूर्वी जे वायदे करार करण्यांत आले आहेत व जे मुंबई कापूस करार अधिनियम, १९२२ याच्या उपबंधांअन्वयें निरर्थक झाले नसते ते वायदे करार, हा अधिनियम व तदन्वयें केलेले उपविधि यांच्या उपबंधांचें उल्लंघन करतात याच केवळ कारणावरून निरर्थक आहेत असें समजतां कामा नये.